वर्ष-०७ | अंक-५१ | मुंबई, मंगळवार ०९ ते १५ नोव्हेंबर २०२१ | पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र
●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
याला बाप म्हणावं की सैतान, पोटच्या नऊ वर्षाच्या मुलीवर बलात्कार, डोंबिवलीत काय चाललंय?

3 → टी-20 वर्ल्डकप सामन्यांवर सट्टा; नाशिकमध्ये 5 लाखांच्या मुद्देमालासह दोघांना बेड्या

बचत गटवाल्या चौकडीने औरंगाबादेतल्या वकील महिलेलाही फसवलं, 18 लाखांचा गंडा घातल्याचं उघड ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## अनिल देशमुख पुन्हा 'ईडी'च्या ताब्यात



मुंबई : आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपाप्रकरणी अटकेत असलेले माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्याचा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय उच्च न्यायालयाच्या विशेष सुट्टीकालीन एकलपीठाने रविवारी रद्द केला. तसेच देशमुख यांना १२ नोव्हेंबरपर्यंत अंमलबजावणी संचालनालयाची (ईडी) कोठडी सुनावली. देशमुख यांची दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे म्हणावी तशी चौकशी करता आली नाही. त्यांच्याकडूनही उत्तरे देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा दावा करत 'ईडी'ने त्यांना आणखी नऊ दिवसांच्या कोठडीची मागणी केली होती. ...पान २ वर...

## देशात तुरुंगाचे खासगीकरण झालयं का? सेनेचा विरोधकांना सवाल



भाजपचे नेते रोज सकाळी उठून याला किंवा त्याला तुरुंगात टाकू असं धमकवत आहेत. त्यामुळे देशातील तुरुंगाचे खासगीकरण झाले आहे, असा सवाल सामना अग्रलेखातून शिवसेनेकडून विरोधकांना करण्यात आला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून आर्यन खान ड्रग्ज प्रकरण चांगलचं गाजत आहे. याच काळात इंधनदरवाढ झाली मात्र विरोधक यावर काहीच बोलताना दिसत नाहीत. पेट्रोल ५ रुपयांनी कमी केलं म्हणून ते बागडत आहेत. पण ५ रुपयांनी कमी करुनही पेट्रोल डिझेल शंभरीपार आहे. याच मुद्द्यावरुन शिवसेनेने त्यांच्या रोख ठोक सदरातून विरोधकांवर हल्लाबोल केला आहे.

पुढे त्यांनी असे म्हटले आहे की, देशातील अनेक कंपन्या विकल्या गेल्या, त्यांचे खासगीकरण केले. त्याचप्रकारे तुरुंगाचेही खासगीकरण झाले आहे का? असा प्रश्न राऊतांनी विचारला आहे. देशात रेल्वेपासून एअर इंडियापर्यंत सगळ्याचे खासगीकरण झाले आहे. इतकेच काय तर ईडी, एनसीबी,सीबीआय हे मागील काही काळापासून ज्या प्रकारचे काम करत आहेत. त्यावरुन तरी त्यांचे खासगीकरण झाले असे असेच चित्र दिसत आहे. रोज सकाळी उठून भाजप नेते याला किंवा त्याला तुरुंगात टाकू असं म्हणतात तेव्हा देशातील तुरुंगाचे खासगीकरण झाले आहे का असा प्रश्न पडतो. मोदी हे तो मुमकीन है! हे देखील यावेली खरे वाटते,असा टोला राऊतांनी अग्रलेखातून लगावला आहे.

त्याचप्रमाणे पुढे त्यांनी म्हटले आहे, अनिल देशमुख कोणत्याही ठोस पुराव्यांशिवाय केंद्रीय तपास यंत्रणेच्या ताब्यात आहेत. आर्यन खानला प्रसिद्धी,पैसा आणि भाजपच्या दबावामुळे अटक केल्याचे राऊतांनी म्हटले आहे.

त्याचप्रमाणे रिया चक्रवर्तीवर अन्याय झाला त्यावेळीस ही मीडिया आणि राजकारणी गप्प राहिले होते. समीर खानच्या बाबतीतही महाराष्ट्र, सरकार आणि लोक गप्प बसले होते.

## एसटी कर्मचाऱ्यांचे अचानक कामबंद आंदोलन

*राज्य परिवहन महामंडळ सरकारमध्ये विलीन करण्यात यावे तसेच इतर मागण्यांसाठी विविध ठिकाणी एसटी कर्मचाऱ्यांकडून आंदोलन करण्यात येत असले तरी दिवाळी संपताच ठाण्यात रविवारी सकाळपासून एसटीच्या ठाणे एक आणि ठाणे दोन आगारातील कर्मचाऱ्यांनी अचानक काम बंद आंदोलन पुकारले होते.*

ठाणे, राज्य परिवहन महामंडळ सरकारमध्ये विलीन करण्यात यावे तसेच इतर मागण्यांसाठी विविध ठिकाणी एसटी कर्मचाऱ्यांकडून आंदोलन करण्यात येत असले तरी दिवाळी संपताच ठाण्यात रविवारी सकाळपासून एसटीच्या ठाणे एक आणि ठाणे दोन आगारातील कर्मचाऱ्यांनी अचानक काम बंद आंदोलन पुकारले होते. या आंदोलनामुळे एसटीच्या वाहतुकीवर परिणाम होऊन आगारातून बस बाहेर पडू शकल्या नाहीत. परिणामी, बसअभावी प्रवाशांचे हाल झाले. या आंदोलनाला भाजपचे आमदार संजय केळकर यांनी पाठिंबा देत, खोपट एसटी स्थानकात आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांची भेट घेतली.

कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत एसटी कामगारांच्या संघटना आक्रमक झाल्या आहेत. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात ठाण्यातील एसटीच्या विभागीय कार्यालयाबाहेर विविध संघटनांनी संयुक्तरीत्या लाक्षणिक उपोषण केले होते. हे उपोषण संपूर्ण राज्यात करण्यात आले होते. औद्योगिक



न्यायालयाने संप करण्यास मनाई केली असून एसटी महामंडळाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सध्या या याचिकेवर न्यायालयात सुनावणी सुरू असली तरी कर्मचाऱ्यांचे आंदोलन थांबलेले नाही. दिवाळी संपताच रविवारी सकाळपासूनच ठाण्यातील एसटीच्या ठाणे १ आणि ठाणे २ आगारातील कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे काम बंद आंदोलन पुकारले. जवळपास १०० ते १५० कर्मचारी खोपट एसटी स्थानकामध्ये जमा झाले होते. यावेळी त्यांनी निदर्शने केली. काम बंद आंदोलनाचा फटका एसटीच्या वाहतुकीला बसला असून रविवारी सकाळी या दोन्ही आगारांतून बस बाहेर पडल्या नाहीत. या दोन्ही आगारांतून खूप कमी बस बाहेर पडल्याने लांब पल्ल्याच्या तसेच शहराअंतर्गत धावणाऱ्या बसच्या वाहतुकीवर परिणाम झाला. बसच नसल्याने प्रवाशांचे हाल झाले. दिवाळीनिमित्त अनेकजण नातेवाईक, आप्तेष्टांकडे तसेच गावी गेले आहेत. दिवाळी संपल्याने सर्वजण घरी परतू लागले आहेत. अशा परिस्थितीमध्ये कर्मचाऱ्यांच्या काम बंद आंदोलनामुळे बसअभावी प्रवाशांची गैरसोय झाली आहे. शिवाय एसटी प्रशासनाला प्रवाशांच्या तिकिटापोटी मिळणाऱ्या उत्पन्नासही मुकावे लागत आहे. एसटीच्या ठाणे विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आंदोलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांची भेट घेऊन 'विनाकारण प्रवाशांना वेठीस धरू नका, आंदोलन पाठीमागे घ्या' अशी विनंती केली. परंतु तरीही कर्मचारी आंदोलनावर ...पान २ वर...

## अज्ञात वाहनाच्या धडकेत 3 जण ठार 1 गंभीर; नाशिक-मुंबई महामार्गावरील घटना




नाशिकः नाशिक-मुंबई महामार्गावर एका अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत 3 जण जागीच ठार झाले आहेत, तर 1 जण गंभीर जखमी झाला आहे. मृतात एका लहान मुलाचा समावेश असल्याचे समजते. नाशिक-मुंबई महामार्ग हा अत्यंत धोकादायक झाला आहे. या रस्त्यावर वारंवार अपघात घडत आहेत. सोमवारीही त्याची पुनरावृत्ती झाली. चौफुली घाटात एका अज्ञात वाहनाने मोटारसायकलवर जाणाऱ्यांना मागून धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, यात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. सध्या जखमीवर घोटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृतामध्ये एका लहान मुलाचा समावेश आहे. साधारणतः दुपारी साडेचारच्या सुमारास ही घटना घडली आहे. दुचाकीला धडक दिल्यानंतर वाहनचालक फरार झाला आहे. दरम्यान, पंधरा दिवसांतला हा दुसरा अपघात आहे. यापूर्वी मुंबई – नाशिक महामार्गावर बोरटेंभे ब्रिजजवळ भीषण अपघात झाला ...पान २ वर...

## औरंगाबादेत चोरट्यांचीच दिवाळी, दहा घरे फोडली, एकट्या पुंडलिकनगरात पाच घरफोड्या



औरंगाबादः दिवाळीच्या काळात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवू, गस्त घालू अशी आश्वासने देणाऱ्या पोलिसांवर चोरांनी मात केल्याचेच चित्र दिसले. दिवाळीच्या दरम्यान शहरात अनेक ठिकाणी चोरट्यांनी घरो फोडून डल्ला मारल्याचे उघडकीस आले आहे. शहरातील दहा घरांत चोरी झाली असून एकट्या पुंडलिकनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतच पाच घरे चोरट्यांनी फोडून लाखोंचा ऐवज लंपास केला. यासह जवाहरनगर, उस्मानपुरा, बेगमपुरा, सिडकोतही चोरट्यांनी धुकाकूळ घातला. यावरून पोलिसांची गस्त कमी पडल्याचे दिसून आले.

### गारखेड्यात चव्हाण यांचे घर फोडले

आनंद राजकुमार चव्हाण हे चार भावांसह गारखेडा परिसरात राहतात. दिवाळीनिमित्त ते वैजापूर येथे गेले होते. त्यांचे लहान बंधू अजय चव्हाण हे शनिवारी रात्री दहा वाजेपर्यंत ...पान २ वर...

## आयटी पार्कमध्ये गाडी भाड्याने लावा, 25 हजार कमवा, पुण्यातील 300 कारमालकांची कशी झाली फसवणूक?



पुणे : सध्याच्या काळात कोण कोणाची कशी फसवणूक करेल, याचा काही नेम नाही. असाच प्रकार पुणे जिल्ह्यात घडला आहे. आयटी पार्कमध्ये गाडी भाड्याने लावून महिन्याला घरबसल्या पैसे कमवा, या आमिषाला अनेक जण बळी पडले आहेत. विशेष म्हणजे माजी सरपंचाकडूनच अनेक जणांची फसवणूक झाल्याचं समोर आलं आहे. काय आहे प्रकरण? आयटी पार्कमध्ये चारचाकी कार भाड्याने लावून महिन्याला 25 हजार रुपये मिळणार, या आमिषाला भुलून अनेक जणांनी चारचाकी गाड्या घेतल्या. मात्र सध्या या गाड्या आरोपीने परस्पर विकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. खेड तालुक्यातील 55 वाहनांबाबत खेड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे ...पान २ वर...



पोलीस
बातमी पत्र
मुंबई
मुंबई, मंगळवार ०९ ते १५ नोव्हेंबर २०२१


# नगर आगीच्या दुर्घटनेत 11 जणांचा मृत्यू, राऊत सरकारवर भडकले, म्हणतात, अश्रू ढाळू नका, 'काय पावलं उचलणार ते सांगा'

मुंबई : अहमदनगरच्या इस्पितळात आगीच्या दुर्घटनेत 11 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. राज्यात दिवाळी साजरी होत असतानाच नगरच्या दुर्घटनेने आनंद होरपळून खाक झाला आहे. नगर जिल्हा रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागास शनिवारी आग लागली. त्यात 11 रुग्णांचा होरपळून मृत्यू झाला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर तोफ डागली आहे. आता घटना घडल्यानंतर केवळ अश्रू ढाळू नका तर असे प्रकार घडू नयेत म्हणून कोणती पावलं उचलणार ते सांगा, असा खडा सवाल त्यांनी दोन्ही सरकारांना विचारला आहे.

**अश्रू ढाळू नका, 'काय पावलं उचलणार ते सांगा'**

नगरच्या इस्पितळात आगीच्या दुर्घटनेत 11 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यासाठी निमित्त शॉर्टसर्किट ठरले असले तरी आरोग्य व्यवस्थेची ही होरपळ आता तरी थांबायला हवी. अर्थात, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था ही केंद्र सरकार आणि राज्य सरकार या दोघांचीही जबाबदारी आहे. सध्या मरण स्वस्त झाले हे मान्य, पण ते इतके अमानुष व क्रूर असावे? सरकारने आता फक्त अश्रू ढाळू नयेत. हे पुनः पुन्हा घडू नये यासाठी काय ठोस पावले उचलणार ते फक्त सांगा, असा सवाल केंद्र आणि राज्य सरकारला राऊत यांनी विचारला आहे.

**ICU मधील नित्कृष्ठ व्हेंटिलेटर्स पीएम केअर्स फंडातून, त्याचमुळे शॉर्टसर्किट, रोहित पवारांना संशय**

नगरची आग म्हणे शॉर्टसर्किटमुळे लागल्याचे समोर आले आहे. अतिदक्षता कक्षाचे फायर ऑडिट करण्यात आले होते अशी माहिती नगरचे जिल्हाधिकारी भोसले यांनी दिली आहे. तरीही रुग्णांचा



मृत्यू हा गुदमरून झाला की होरपळून झाला हे तपासून पाहू असे सांगण्यात आले. मृत्यू जळून झाला की गुदमरून, हे जरूर तपासा, पण मृत्यू इस्पितळास आग लागल्यामुळेच झाला व जनतेचे रक्षण, संरक्षण करणे हे कोणत्याही सरकारचेच कर्तव्य असते. या ठिकाणी आग का भडकली याची विविध कारणे आता समोर येत आहेत. अतिदक्षता विभागातील व्हेंटिलेटर्स ही पीएम केअर्स फंडातून देण्यात आली होती. ती निकृष्ट दर्जाची होती व त्यामुळेच शॉर्टसर्किट झाले असावे असा संशय आमदार रोहित पवार यांना आहे. आग कशाने लागली व भडकली या संशोधनातून आता राजकीय आरोप-प्रत्यारोप भडकू नयेत.

**महासत्ता म्हणवून घेणाऱ्या देशाला हे चित्र शोभत नाही**

देशाची आरोग्य यंत्रणा कशी गोलमाल आहे त्याचा पर्दाफाश कोरोना काळात झालाच आहे. आरोग्य व्यवस्थेवर सगळ्यात कमी खर्च करणारा विशाल देश असे आपल्या बाबतीत बोलले जाते. देशातील आरोग्य व्यवस्था भुसभुशीत पायावर उभी आहे. आजही दुर्गम भागात, खेड्यापाड्यांत इस्पितळे नाहीत, रुग्णवाहिका नाहीत. रुग्णांना पाठीवर उचलून किंवा झोळीत बांधून न्यावे लागते. अनेकदा मृतदेहांची ससेहोलपट होताना दिसते. हे चित्र तथाकथित महासत्ता म्हणवून घेणाऱ्या देशाला शोभत नाही.

**आरोग्य व्यवस्था कोलमडलीय**

बिहार, ओडिशासारख्या राज्यात आरोग्य व्यवस्था कोसळून गेली आहे. महाराष्ट्रात नगर-गोंदियासारख्या दुर्घटनांमुळे आरोग्य यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण होतात हेदेखील आहेच. एकतर धड उपचार मिळत नाहीत व अनेकदा उपचार सुरू असताना अपघात होतात व रुग्ण प्राण गमावतात. हे महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात अनेक भागांत घडत आहे. आरोग्य व्यवस्था आयसीयूमध्ये बेजार होऊन पडलीय आज देशातीलच आरोग्य व्यवस्था अतिदक्षता विभागात बेजार होऊन पडल्याचे चित्र आहे. जिल्ह्याजिल्ह्यांत डॉक्टरांची कमतरता आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिकामी आहेत. कंत्राटी पद्धतीने वैद्यकीय सेवा पुरवण्यावर भर आहे. त्या कंत्राटी अधिकाऱ्यांचे मानधनही शासनाने थकवले आहे. ज्या राज्यात डॉक्टर्स, शिक्षक संपावर जातात त्या राज्याची अवस्था बरी नाही असे सर्वसाधारणपणे मानायला हवे.

**सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरचा खर्च जेमतेम दोन-तीन टक्के**

अनेक सरकारी रुग्णालयांत एक्स-रेची व्यवस्था नाही. कान, नाक, घसा, भूलतज्ञ, डॉक्टर्स नाहीत. एखादी शस्त्रक्रिया करायची असेल तर चांगले रुग्णालय नाही. आपल्याकडे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरचा खर्च जेमतेम दोन-तीन टक्क्यांच्या आसपास होतोय. 'कोविड-19'च्या महामारीमुळे देशाला व राज्याला आरोग्यमंत्री आहेत हे निदान समजले तरी, नाहीतर मंत्रिमंडळात गृह, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, ऊर्जा याउपर कोणतीच खाती नाहीत असेच चित्र पूर्वी होते.

**त्यांना भांडवली आरोग्य व्यवस्था परवडणार आहे काय?**

केंद्रातही रेल्वे, पेट्रोलियम, संरक्षण, गृह हीच महत्त्वाची खाती ठरतात व आरोग्य मंत्रालय दुय्यम ठरवले जाते. आरोग्य व्यवस्थेत सरकारला कालपर्यंत कोणताच रस नव्हता. आरोग्य व्यवस्थेचेही संपूर्ण खासगीकरण व्हावे या मताचे आपले सरकार आहे, पण ज्या देशाची बहुसंख्य जनता गरीब व दारिद्र्यरेषेखालील आहे, त्यांना ही भांडवली आरोग्य व्यवस्था परवडणार आहे काय?

# मेट्रो स्टेशनवर का असतात पिवळ्या रंगाच्या खडबडीत टाइल्स?



मुंबई : आपण मेट्रो स्टेशन किंवा रेल्वे स्टेशन वर ओबड-धोबड खडबडीत टाइल्स असतात. हे टाइल्स सरळ किंवा गोल आकाराचे असतात. मात्र या टाइल्स मेट्रो किंवा रेल्वे स्टेशनवर का लावल्या जातात तुम्हाला माहित आहेत का? अनेकांना वाटतं की प्लॅटफॉर्मवरून घसरून पडू नये म्हणून या टाइल्स लावल्या जातात. मात्र तस नाही. जाणून घ्या मेट्रो स्टेशन आणि रेल्वे स्ट्रेशनवर का असतात या टाइल्स.

**पिवळ्या रंगा मागच्या टाइल्समागील रहस्य**

मेट्रो स्टेशनवर अंध लोकांसाठी सरळ आणि गोल आकाराच्या टाइल्स बसवण्यात आल्या आहेत. या खडबडीत टाइल्सच्या मदतीने जे लोक डोळ्यांनी पाहू शकत नाहीत ते स्टेशनवर चालत जाऊ शकतात. स्टेशनवरील गोल फरशा थांबण्याचे संकेत देतात. तर सरळ फरशा म्हणजे पुढे जा. या टाइल्सच्या साहाय्याने दृष्टिहीनांना चालण्याची खूप सोय होते. या टाइल्सना टॅक्टाइल पाथ म्हणतात.

मेट्रो स्टेशनवर अंध लोकांसाठी सरळ आणि गोल आकाराच्या टाइल्स बसवण्यात आल्या आहेत. या खडबडीत टाइल्सच्या मदतीने जे लोक डोळ्यांनी पाहू शकत नाहीत ते स्टेशनवर चालत जाऊ शकतात. स्टेशनवरील गोल फरशा थांबण्याचे संकेत देतात. तर सरळ फरशा म्हणजे पुढे जा. या टाइल्सच्या साहाय्याने दृष्टिहीनांना चालण्याची खूप सोय होते. या टाइल्सना टॅक्टाइल पाथ म्हणतात.

**टॅक्टाइल पाथचा आणखी एक फायदा**

मेट्रो स्टेशनवर या टाइल्सचा आणखी एक फायदा आहे हे जाणून घ्या. मेट्रो स्टेशनवर एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी जोडण्यासाठी अनेक प्रकारच्या केबल्स, पाईप्स आणि वायर्स बसवण्यात आल्या आहेत. या टाइल्सच्या खालून पाईप्स, केबल्स आणि वायर्स घेतल्या जातात. या कनेक्शनमध्ये काही अडचण आल्यास या टाईल्स सहजपणे काढून टाकून कनेक्शनमध्ये येणारी अडचण दूर केली जाते. या टाइल्स काढणे सोपे आहे. कनेक्शन निश्चित केल्यानंतर,

या टाइल्स पुन्हा घातल्या जातात.

# पार्किंगवरुन मामाचा वाद, मध्यस्थी करणाऱ्या भाच्यावर हल्ला, भाऊबीजेलाच चार बहिणींचा 'दादा' हरपला

भोपाळ : मामाच्या घरी दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या भाच्याला हकनाक जीव गमवावा लागला. कार पार्क करण्यावरुन मामाचे भांडण होत असताना भाच्याने मध्यस्थी केली. मात्र यावेळी धारदार शस्त्रांनी वार करुन टोळक्याने त्याची हत्या केली, तर मामा गंभीर जखमी झाला आहे. मध्य प्रदेश पोलिसांनी या प्रकरणी 10 जणांना ताब्यात घेतले आहे.

**काय आहे प्रकरण?**

22 वर्षीय राजा वर्मा मध्य प्रदेशातील इंदिरा नगर खरगोन येथे राहत होता. खरगोनपासून सुमारे 20 किमी अंतरावर असलेल्या बरुड पोलीस स्टेशन हद्दीतील उमखळी येथे त्याचे मामा पप्पू वर्मा राहतात. पप्पू वर्मांचे कार पार्क करण्यावरून गावातीलच काही जणांसोबत किरकोळ भांडण झाले होते. यानंतर पप्पू वर्मांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती.

**त्या दिवशी काय घडलं?**

पोलिसात तक्रार दिल्यानंतर काही जण धारदार शस्त्रांसह पप्पू वर्मांच्या घरी पोहोचले आणि त्यांनी हल्ला केला. मामाशी वाद सुरु असताना राजाही मध्यस्थी करण्यासाठी पोहोचला. त्यावेळी काही जणांनी राजावर धारदार शस्त्रांनी हल्ला केला. जखमी अवस्थेत मामा-भाच्याला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

**भाऊबीजेच्या दिवशीच दादा गेला**

धारदार शस्त्रांनी झालेल्या खोल जखमांमुळे शनिवारी राजाचा मृत्यू झाला, तर मामा पप्पू वर्मा




यांच्यावर उपचार सुरू आहेत. मयत राजाला चार बहिणी आहेत.

तो चौघी बहिणींचा एकुलता एक भाऊ होता. ऐन भाऊबीजेच्या दिवशी राजाच्या मृत्यूमुळे बहिणींचा आधार हरपला.

**मामा म्हणतो आरोपींना फाशी द्या**

राजाचे मामा पप्पू उर्फ श्यामलाल वर्मा यांच्या माहितीनुसार ट्रॅक्टर-ट्रॉली उभ्या करण्यावरुन हा वाद झाला होता. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. सायंकाळी ते शस्त्रास्त्र घेऊन आले आणि त्यांनी हल्ला केला. माझा भाचा राजा दिवाळी साजरी करण्यासाठी पाडव्याला आमच्या घरी आला होता. मध्यस्थी करत असताना त्याच्यावर चाकूने हल्ला करण्यात आला, त्यात त्याचा मृत्यू झाला.

गावातील अनेक जणांचा यात सहभाग होता. आरोपींवर कठोर कारवाई व्हावी आणि त्यांना जन्मठेप किंवा फाशीची शिक्षा द्यावी,

अशी आपली इच्छा असल्याचं मामा म्हणाले.

## पृष्ठ १ वरुन

### अनिल देशमुख पुन्हा 'ईडी'च्या ताब्यात

मात्र विशेष न्यायालयाने शनिवारी ईडीची मागणी फेटाळत देशमुख यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. त्यानंतर देशमुख यांना आर्थर रोड कारागृहात हलवण्यात आले होते. मात्र देशमुख यांना न्यायालयीन कोठडी सुनावून मोठय़ा प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झालेल्या गंभीर अशा गुन्ह्य़ाचा तपास करण्यासाठी आम्हाला पुरेशी संधी नाकारली गेली, असा दावा करत 'ईडी'ने विशेष न्यायालयाच्या निर्णयाला रविवारी उच्च न्यायालयात आव्हान दिले व याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणीही केली. त्यामुळे रविवारची सुट्टी असतानाही न्यायमूर्ती माधव जामदार यांनी 'ईडी'च्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेतली. न्यायालयाचे म्हणणे.. विशेष न्यायालयाच्या आदेशाच्या कायदेशीर वैधतेबाबत 'ईडी'ने उपस्थित केलेल्या मुद्दय़ात सकृतदर्शनी तथ्य वाटत असल्याचे न्यायमूर्ती जामदार यांनी नमूद के ले. मात्र 'ईडी' कोठडीसाठी देशमुख यांच्या वकिलांनी दाखवलेल्या सहमतीची दखल घेत विशेष न्यायालयाच्या आदेशाच्या कायदेशीर वैधतेच्या तपशिलात जाण्यास नकार दिला. तसेच देशमुख यांना १२ नोव्हेंबपर्यंत आणखी सहा दिवसांची 'ईडी' कोठडी सुनावली.

### एसटी कर्मचाऱ्यांचे अचानक कामबंद आंदोलन

ठाम राहिले. कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला ठाण्यातील भाजपचे आमदार संजय केळकर यांनी पाठिंबा दिला असून रविवारी केळकर यांनी खोपट बस स्थानकात कर्मचाऱ्यांची भेट घेतली. कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या असून गेल्या दोन वर्षांत एसटी कर्मचाऱ्यांना आश्वासनाशिवाय काहीच मिळाले नसल्याची टीका यावेळी केळकर यांनी केली. ९५ लाखांचे उत्पन्न भाऊबिजेच्या दिवशी एसटीच्या ठाणे विभागाला तब्बल ९५ लाखांचे उत्पन्न मिळाले असल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. यातील ठाणे १ आगाराचे उत्पन्न २५ लाख आणि ठाणे २ आगाराचे उत्पन्न १८ लाख इतके असल्याचे या अधिकाऱ्याचे म्हणणे आहे. एसटीची आर्थिक परिस्थिती अगोदरच वाईट आहे. त्यात काम बंद आंदोलनामुळे एसटीला आणखी मोठा फटका बसेल. तसेच, प्रवाशांचीही मोठी गैरसोय होऊ लागल्याचे अधिकारी सांगतात.

### औरंगाबादेत चोरट्यांचीच

घरी होते. त्यानंतर ते कुटुंबियांसह तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी गेले. त्यानंतर चोरट्यांनी कुलूप तोडून 10 तोळ्यांचे चांदीचे पैंजण, 7 तोळ्यांचे चांदीचे कडे, 12 तोळ्यांचे बाजूबंद, दीड तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र, इत्यादी दागिन्यांसह 30 हजार रोकड लंपास केली. शनिवारी रात्री दहानंतर हे घर बंद होते. शनिवारी रात्री ही चोरी उघडकीस आल्यानंतर परिसरातील आणखी पाच घरे फोडल्याचे उघडकीस आले. एकट्या नवनाथनगरमध्ये पाच घरे फोडण्यात आली. तसेच भारत नगरात एक घर फोडून चोरट्यांनी ऐवज लंपास केला. या प्रकरणी पुंडलिकनगरात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपनिरीक्षक धनाजी आढाव करीत आहेत.

किलेअर्क आणि सिडकोमध्येही चोरट्यांचा धुमाकूळ

दिवाळीच्या काळात चोरांनी जवाबरनगर, उस्मानपुरा, बेगमपुरा आणि सिडको व वाळूज पोलीस ठाण्याच्या हद्दीतही डल्ला मारला. पोलिसांनी तीन ते चार वेळा लावलेली फोल ठरली. किलेअर्क परिसरातील फिरोज खान शरीफ खान पठाण हे 04 ऑक्टोबरला घराला कुलूप लावून कुटुंबियांसह सिल्लोडमध्ये गेले होते. ही संधी साधून चोरट्यांनी दरवाज्याचे कुलूप तोडून डल्ला मारला. घरातील 20 हजार रुपये रोकड आणि सोन्या-चांदीचे दागिने असा 44 हजार 900 रुपयांचा ऐवज लंपास केला. सिडको, रेणुकामाता मंदिराजवळ चोरी सिडको एन-9 परिसरातील रेणुकामाता मंदिराच्या पाठीमागे राहणारे अमित काकडे यांच्या घराचा कडी कोंडा तोडून चोरट्याने 35 हजार रुपये किंमतीचा ऐवज लंपास केला. ही घटना 2 नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास घडली.

बीडबायपास रोडवर सुरक्षरक्षकालाच लुटले शहरातील बीडबायपास रोडवर 6 नोव्हेंबर रोजी बीड बायपास रोडवरील मराठा हॉटेलजवळ सुरक्षा रक्षकालाच दोघांनी मारहाण करीत लुटले. ड्युटी संपल्यावर दुचाकीने घराकडे जाणाऱ्या सुरक्षा रक्षकाला रिक्षातून आलेल्या दोघांनी त्यांची दुचाकी अडवून मारहाण केली. त्यांचा मोबाइल, रोकड आमि दुचाकी असा 63 हजार रुपयांचा ऐवज लुटून नेला. या प्रकरणी मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास उपनिरीक्षक श्रीकांत भराटे करीत आहेत.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत 3 जण

होता. त्यात आयशर आणि पिकअप गाडी धडकून तिघे जण जखमी झाले. अपघातात पिकअप कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. शुक्रवारी सकाळी 7 वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. यामध्ये एक जण गंभीर जखमी झाला असून, दोघा जणांना किरकोळ दुखापत झाली आहे. जखमींना रुट पेट्रोलिंग टीमने वाहतूक पोलिसांच्या मदतीने बाहेर काढले. दुचाकी-कारची टक्कर नाशिक जिल्ह्यात इगतपुरी परिसरातील पारदेवीजवळ बाईक आणि क्रेटा कार यांचा भीषण अपघात झाला. कार आणि बाईक यांची समोरासमोर धडक झाली. धडकेनंतर बाईकसकट तरुण फरफटत गेला, तर एक जण फेकला गेला. हा अपघात इतका भीषण होता, की अपघातात नाशकातील डाक बंगला परिसरात राहणाऱ्या करण मनोहर या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. शनिवारी सायंकाळी 5 वाजताच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेनंतर परिसरावर शोककळा पसरली आहे. संतप्त झालेल्या नागरिकांनी गाडी पेटवून दिली. या आगीत गाडी जळून खाक झाली आहे. कारची उभ्या ट्रकला धडक नाशिक जिल्हात एका कारने उभ्या असलेल्या आयशर ट्रकला पाठीमागून धडक दिली. नाशिक-पुणे महामार्गावर नांदुरशिंगोटे परिसरात ही घटना घडली. त्यात एका औषध कंपनीचे दोन मॅनेजर, एक मार्केटिंग प्रतिनिधी जागीच ठार झाले. मृतांमध्ये शरद गोविंदराव महाजन (वय 39, रा. म्हसरूळ, नाशिक), भूषण बाळकृष्ण बधान (वय 36, रा. पाथर्डी फाटा, नाशिक) आणि राजेश तिवारी (वय 34, रा. कल्याण, ठाणे) या तिघांचा समावेश आहे. तिन्ही मृतदेहांचे दोडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले. अपघाताने घटनास्थळी काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. मात्र, महामार्ग पोलिसांनी तात्काळ धाव घेत अपघातग्रस्त वाहने हटवली आणि मदतकार्यही केले.

### आयटी पार्कमध्ये गाडी भाड्याने

जिल्ह्यातून 300 पेक्षा जास्त वाहन चालकांची फसवणूक झाली असल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. माजी सरपंचाकडून फसवणूक स्वतःच्या वापरासाठी घेतलेल्या या गाड्या जास्त भाडे मिळणार, या लालसेपोटी अनेक जणांनी राजगुरुनगर येथील अमोल भागडे याला भाडे तत्त्वावर दिल्या. त्यासाठी अनेकांनी बँक, फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेतले आहे. अमोल भागडेने या वाहन मालकांसोबत करारही केले. यानंतर भागडेने साबळे वाडी येथील माजी सरपंच सचिन साबळे याला ही वाहने दिली. उडवाउडवीची उत्तरेत्यासाठी वाहन चालकांची व्यवस्था सचिन साबळे हाच पाहणार होता. गाडी प्रत्यक्षात कुठे वापरली जाणार याबाबत मालकांनाही कल्पना नव्हती. सुरुवातीला साबळेने भाडे दिले, मात्र पुढे भाडे मिळाले नाही. याबाबत चौकशी केली असता साबळे उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. अनेक महिने असे घडल्यावर अमोल भागडे यानेच खेड पोलीस ठाणे गाठले. तेव्हा हा सगळा प्रकार उघडकीस आला.

ऐन दिवाळीच्या वेळी आपल्या गाडीचे नेमके काय झाले असावे? या भीतीने गाडी मालकांना धडकी भरली आहे. आता खेड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाल्यानंतर G P S च्या माध्यमातून वाहनांचा शोध सुरू आहे. बीड जिल्ह्यात पथके पाठवण्यात आली आहेत. आतापर्यंत पोलिसांनी 20 वाहने ताब्यात घेतली आहेत, मात्र अजूनही मोठ्या संख्येने वाहने असू शकतात, असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार ०९ ते १५ नोव्हेंबर २०२१




## संपादकीय...



## इंधन दराची फुंकर, तिजोरी भरली, राख उरली

दिवाळीच्या मुहूर्तावर पेट्रोल आणि डिझेलवरील अबकारी कर प्रतिलिटर अनुक्रमे पाच आणि दहा रुपयांनी कमी करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. गेल्या वर्षभरात सातत्याने वाढणाऱ्या दरामुळे सर्व पातळ्यांवर महागाई वाढत आहे. मध्यमवर्गीय माणसांपासून शेतकऱ्यांपर्यंत सर्वच वर्ग या वाढत्या दराने हैराण बनला होता. त्याला दिलासा देण्याचा हा प्रयत्न आहे; पण तो केविलवाणा आहे. इंधनाच्या विक्रीतून सरकारने आपली तिजोरी भरून घेतली. त्यातून सरकारची दिवाळी साजरी झाली आणि जनतेचे दिवाळे निघत राहिले. आता केवळ राखेवर फुंकर मारावी, तसे प्रतिलिटर ११५ रुपयांचे पेट्रोल केवळ पाच रुपयांनी कमी करण्यासाठी अबकारी कर कमी केला आहे.पुढील आठवडाभरात कच्च्या तेलाचे आंतरराष्ट्रीय बाजारातील दर वाढल्यास पुन्हा हे दर वाढतच राहणार आहेत. त्यामुळेच केवळ अंगावरील पडलेली राख झाडायचा किंवा तिच्यावर फुंकर मारण्याचा हा प्रकार आहे. गत सहामाहीत केंद्र सरकारने उत्पादन कर, अबकारी कर आणि सेसच्या माध्यमातून पेट्रोल-डिझेलच्या विक्रीतून १ लाख ७१ हजार कोटी रुपये तिजोरीत भरून घेतले आहेत. ‘आता सरकारचे पोट भरले; तुम्ही जेवून घ्या,’ असे प्रजेला सांगत राजा उदार झाला आहे. वाढलेली महागाई कमी होणार नाही. एकशे पंधरा रुपयांत पाच रुपयांची सवलत आहे. एकशे पाच रुपयांवरील डिझेलच्या दरात केवळ दहा रुपयांची सवलत असणार आहे. हा फरक दहा टक्क्यांपेक्षा कमी आहे. गत वर्षात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात चाळीस टक्क्यांची वाढ करणे अनाकलनीय आहे. हा परिणाम दोन-तीन राजकीय कारणांचा असावा. कारण जेव्हा केव्हा प्रांतीय पातळीवरील निवडणुका सुरू होतात, तेव्हा पेट्रोल-डिझेलचे दर स्थिर कसे होतात? भारतात निवडणुका चालू झाल्या की, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ ठप्प पडते का? कच्च्या तेलाचे दर न वाढविण्याचा निर्णय घेण्यात येतो का? आता जेव्हा दर वाढतात, तेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेकडे बोट दाखविले जाते.लवकरच उत्तर प्रदेशासह पाच राज्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर दर कमी करण्याची बुद्धी सरकारला सुचली असावी. शिवाय ३० ऑक्टोबरला अकरा राज्यांतील पोटनिवडणुका झाल्या. त्याचा निकाल मंगळवारी २ नोव्हेंबर रोजी जाहीर झाला. त्यात भाजपला धक्का बसला. भाजपच्या बाजूने एकतर्फी हवा आहे, असे जे वातावरण केले जायचे, त्यालाच धक्का बसला आहे. गेले सहा महिने पेट्रोल-डिझेलचे दर वाढत असताना पोटनिवडणुकांच्या निकालानंतर दर कमी करण्याचा निर्णय कसा होतो? हा निश्चितच योगायोग नाही. विधानसभांच्या निवडणुका जाहीर होताच पेट्रोल-डिझेलच्या दरास कुलूप लावले जाते. ज्या दिवशी निकाल जाहीर होतात, त्याचदिवशी मध्यरात्रीपासून वाढीव दर जाहीर होतात. हादेखील योगायोग असू शकत नाही. किंबहुना या निकालासाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठांतील व्यवहार थांबविले जात नाहीत. दर कमी करण्याच्या निर्णयाबरोबरच राज्यांनी आपापल्या प्रदेशात लागू केलेले मूल्यवर्धित कर (व्हॅट) कमी करावा, असे आवाहन केले आहे. परिणामी महागाई कमी होण्यास मदत होईल, असाही दावा केंद्र सरकारने केला आहे. दिवाळी सणातील लक्ष्मीपूजनाचा विधि सर्वांत महत्त्वाचा! लक्ष्मी प्रसन्न झाली, तर कुटुंबातील सुख-समाधान वाढीस लागेल, अशी आशा व्यक्त केली जाते.भक्तिभावाने लक्ष्मीचे पूजन करणारा भारतीय माणूस गैरमार्गाने लक्ष्मीची पावले घरी पडावीत, अशी अपेक्षा कधीच ठेवत नाही. तसे सरकारनेही गैर नसेल; पण अयोग्य व्यवहारातून सामान्य माणसांच्या खिशातील लक्ष्मीचे अपहरण करून घेऊ नये. चालूवर्षी कमी-अधिक प्रमाणात का असेना, सर्वत्र पाऊस झाला आहे. खरिपाचे थोडे नुकसान झाले असले तरी, रब्बीचा हंगाम उत्तम राहील, अशी आशा आहे. सुदैवाने कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता मावळत चालली आहे. लसीचे डोस घेण्याचे प्रमाण फारसे चांगले नसले तरी, शंभर कोटी डोस टोचून झाले आहेत. दुसरा डोस होणे महत्त्वाचे आहे. ते प्रमाण वाढविण्याचे आव्हान आहे. दिवाळीच्या निमित्ताने छोट्या आणि मध्यम शहरांतील बाजारपेठाही गर्दीने भरून वाहत आहेत. ही चांगली लक्षणे आहेत. केंद्र सरकारने आता लोकांच्या हाती पैसा जाईल आणि अर्थव्यवस्थेला गती मिळत राहील याचे नियोजन केले पाहिजे. त्यासाठी केवळ फुंकर मारून चालणार नाही. योग्य दिशा पकडावी लागणार आहे. राज्यांशी बोलून पेट्रोल-डिझेलचे दर वाढणार नाहीत, याची दक्षता घ्यायला हवी !

# प्रकाशाचा परीसस्पर्श

बदल होत राहणारच, पण पंचतत्त्वांचा गौरव करताना वेदांतील ऋचांमधून जो स्वच्छंदी सूर आहे, तोच आजही प्रकाशाचा उत्सव साजरा करताना आहे...

सूर्योदयाच्या आत अभ्यंगस्नान न झाल्यास नरकात जावे लागेल या काल्पनिक भीतीपोटी सर्वांस स्वहस्ते उटणे लावून फटफटायच्या आत आंघोळ घालणाऱ्या आजीच्या आंघोळीचे काय, हा प्रश्न तेव्हा पडायचा नाही. घरातल्यांच्या आवडीनिवडीनुसार फराळाचे पदार्थ करण्यासाठी कष्टणाऱ्या घराघरातल्या आज्या, आया, काकू वा मावश्या यांना काय आवडते हे कधी विचारले गेल्याचे आठवत नाही. पाडव्यास नवऱ्याकडून आणि भाऊबीजेस भावाकडून जे काही ओवाळणीत पडेल त्यातच त्यांनी समाधान मानले. काळाच्या ओघात स्त्रिया कमावू लागल्या. खऱ्या अर्थाने ‘लक्ष्मीपूजन’ सुरू झाले आणि आज घराघरातला हा महिला वर्ग पुरुषांच्या बरोबरीने, निदान शहरांत तरी, दिवाळी पहाट घराबाहेर साजरा करू लागला. आताशा नरकाची भीती कमी झाली की स्वर्ग अनाकर्षक झाला हे माहीत नाही पण दिवाळी सणांत स्त्रियांस उसंत मिळू लागली. कारणे काहीही असोत. जे झाले ते स्वागतार्हच. त्यामुळेच एकेकाळी आईच्याच हातचा फराळ कसा चविष्ट असतो असे सांगणारा ‘मोरू’ आता दिवाळीच्या पहिल्या आंघोळीनंतर नोकरी करणाऱ्या बायकोने मागवलेला तयार फराळ विनातक्रार खाऊ लागला आहे. किंबहुना दिवाळीत फराळ तयार करून तो एतद्देशीय आणि परदेशी ग्राहकांसाठी उपलब्ध करून देणे हा मोठाच गृहउद्योग गेल्या काही वर्षांमध्ये विकसित होत गेला आहे. या कामाचे कौशल्य असणाऱ्या कित्येक स्त्रियांना त्यामुळे रोजगार मिळतो आहे. ४०-५० वर्षांपूर्वी दिवाळी आली की घरोघरी होणाऱ्या स्वच्छता मोहिमा आजही होतात; पण शहरांमध्ये तरी घरातली लक्ष्मी पदर खोचून हातात झाडू घेऊन साफसफाईला उभी राहात नाही; तर ‘डीप क्लीनिंग’ करणाऱ्या कंपन्यांना आधीपासून बुक करून घरसफाईचे कंत्राट दिले जाते. दिवाळीचे चार दिवस दारात पणती लावायची आहे, तेव्हा कुणी कुठे जायचे नाही हा आग्रह विरत जाऊन त्या सलग मिळणाऱ्या सुट्ट्यांचा विनियोग बाहेर फिरायला जायला किंवा एखाद्या रिसॉर्टमध्ये जाऊन चार दिवस आराम करण्यासाठी होऊ लागला आहे.

फुललेल्या बाजारपेठा आणि अमाप उत्साह घेऊन आलेल्या यंदाच्या दिवाळीने एखाद्या गोष्टीचा अभावच तिचे महत्त्व जाणवून देतो याची जणू काही साक्ष दिली आहे. संदर्भ आहे करोनाकाजळीने काळवंडलेल्या मागील वर्षीच्या दिवाळीचा. महासाथीत आलेल्या त्या दिवाळीत घराबाहेर पडण्यावर, फटाके वाजवण्यावर, गर्दी करण्यावर, एकमेकांना भेटण्यावर अशा सगळ्यावरच निर्बंध होते. वातावरणच असे होते की कुणालाच मनासारखी दिवाळी साजरी करता आली नाही आणि त्यामुळेच दिवाळीसारख्या सणाचे, आपल्या उत्सवप्रियतेचे महत्त्व आणखी अधोरेखित झाले. दिवाभीतासारखे आपापल्या घरात कोंडून घेऊन बसणे याला कोण दिवाळी म्हणेल का? खरेदी, उत्साह, सजावट, आतषबाजी, दिवाळी अंक, फराळाची रेलचेल, जिवलगांना भेटणे, चार दिवस आनंदात घालवणे म्हणजे दिवाळी. मागील वर्षी ती साजरी करता आली नाही याची कसर यंदा लोकांच्या दुप्पट तिप्पट उत्साहाने भरून निघाली आहे. दिवाळीचा सणच तसा आहे. भारतीय समाजासारखा, हिंदू संस्कृतीसारखा... सर्वसमावेशक. तो संस्कृतीच्या अंगाने जातो आणि कुठल्याही धार्मिक कर्मकांडापेक्षा एकमेकांना भेटणे, चार दिवस एकत्र येणे, खाणेपिणे, आनंदाने जगणे याला जास्त प्राधान्य देतो. या चार दिवसांच्या साजरीकरणात अमुकतमुक झाले म्हणूनही कुणाच्या भावना दुखावल्या जात नाहीत की अमुकतमुक झाले नाही म्हणूनही कुणाच्या भावना दुखावल्या जात नाहीत. त्यामुळे दिवाळी हा खराखुरा निधर्मी भारतीय सण म्हणायला हवा. सगळ्यांना सामावून घेणारा, सगळ्यांना जोडून घेणारा. जगण्याचा उत्सव करणारा. अंधारातून प्रकाशाकडे जा, जगणे साजरे करा, तुम्ही आनंदात जगा आणि इतरांनाही आनंद द्या हेच त्याचे सांगणे. तसेही माणसाला जगताना खरे तर आणखी काय हवे असते? सुखाच्या, आनंदाच्या प्रत्येकाच्या कल्पना वेगळ्या असतात हे खरे असले तरी त्याच्या मुळाशी जगण्याची असोशीच तर असते. त्यातूनच तर उत्सवांची आणि जगणे साजरे करण्याच्या वेगवेगळ्या कल्पनांची निर्मिती झाली आहे.मात्र या सणांचे सांस्कृतिक महत्त्व टिकवून ठेवताना बाजारपेठीय आणि प्रतिगामी क्लृप्त्यांना बळी न पडण्याचे मोठे आव्हान आपल्यापुढे आहे. स्त्रियांनी टिकली न लावल्यामुळे आणि मीठी जुबाँ उर्दूसारख्या भारतातच जन्मलेल्या भाषेचा वापर केल्यामुळे आभाळ कोसळावे इतकी आपली सांस्कृतिक परंपरा कधीच संकुचित नव्हती आणि नाही. यापुढेही ती संकुचित होऊ न देण्याचे कसब आपल्याला साधावे लागणार आहे. खरे तर काही गोष्टींचे सातत्य राखण्याचे आणि काही गोष्टी काळानुसार बदलण्याचे समाज म्हणून आपण नेहमीच भान बाळगले आहे. दिवाळी पहाट तर आपण एव्हाना स्वीकारलीच आहे. दिवाळीच्या काळात फटाके वाजवून हवेचे आणि ध्वनीचे प्रदूषण करण्याबरोबरच आपल्या वातावरणाचा भाग असलेल्या पशुपक्ष्यांनाही आपण त्रास देतो हा विचार शालेय पातळीपासूनच बिंबवला जाऊ लागला आहे. दिवाळी अंकांच्या परंपरेला डिजिटल आणि दृक्श्राव्य माध्यमही जोडले गेले आहे. हेही बदलच!



पन्नासेक वर्षांपूर्वी साजरी केली जात होती तशी दिवाळी आज नाही हे खरेच; पण आपण तरी कुठे ५० वर्षांपूर्वी होतो तसे आहोत? बदल हीच एकमेव चिरंतन गोष्ट असल्यामुळे व्यक्ती म्हणून आणि समाज म्हणूनही आपले सगळ्यांचेच जगणे ३६० अंशांत बदलले आहे. त्या बदलांचे प्रतिबिंब जसे आपल्या जगण्यात आहे तसेच आपल्या सणांमध्ये असणार. त्या काळात घरी फराळ बनवला जात असेल तर आज तो विकत आणला जातो. त्या काळात हाताने तयार केलेली शुभेच्छापत्रे पाठवली जात असतील तर आज एका सेकंदात सातासमुद्रापार जाणारा डिजिटल शुभेच्छासंदेश आहे. त्या काळी कापसाच्या वाती करून त्या तेलात भिजवून मातीच्या पणत्या लावल्या जात असतील तर आज विजेचे बटण दाबल्यावर लुकलुकणारे पणतीसदृश दिवे आहेत. पण सण साजरे करण्याचा, जगण्याचा उत्सव करण्याचा उत्साह तोच आहे. आणि हेच आपले माणूसपण आहे. गेल्या ५० वर्षांत आपण काय काय नाही बघितले? नैसर्गिक आपत्ती आल्या, मानवनिर्मित कारणांमुळे निर्माण झालेली संकटे आपण झेलली, राजवटी बदलल्या, मोठे वाटावेत असे आधार निखळले. तंत्रज्ञानाने माणसाचे जगणे उलटेपालटे करून टाकले. सगळे जग एखाद्या खेड्याएवढे होईल असे म्हणता म्हणता ते हाताच्या मुठीत कधी सामावले ते कळलेदेखील नाही. आपल्या डोक्यावरचे आभाळ कुठे जाऊन पोहोचते त्याचा थांगपत्ता नसताना जगण्याच्या शोधात भारतवर्षात येऊन पोहोचलेल्या आर्यांचे वर्णन त्यांचे अभ्यासक धाडसी असे करतात. त्याच धाडसी वृत्तीने आजचा माणूस त्याच्या आजच्या जगण्यातल्या सगळ्या संकटांचा सामना करत जगण्याचा उत्सव साजरा करतो.

निसर्गातल्या पंचतत्त्वांचा गौरव करताना वेदांतील ऋचांमधून जो स्वच्छंदी सूर आहे, तोच आजचा हा प्रकाशाचा उत्सव साजरा करताना आहे. त्रास, अडचणी, संकटे, आघात, नकोसे बदल, अभाव हे सगळे आपल्या सगळ्यांच्या रोजच्या जगण्यात कालही होते, आजही आहे आणि उद्याही असणार आहे. पण ते सगळे आपल्याला झेलावे लागते कारण मनुष्यजन्माचा हा परीस न मागताच आपल्या सगळ्यांच्या हाती लागलेला आहे. परिसाच्या शोधात निघालेला माणूस हातात तो आल्यावरही दगड समजून त्याला टाकून देतो अशी एक गोष्ट सांगितली जाते. आपल्या जीवनाचा परीस इतरांच्या आयुष्याचे सोने करणारा नसला तरी तो किमान स्वतःच्या आणि जमल्यास इतरांच्या जीवनातला अंधकार दूर करणारा आणि वाट उजळवणारा असायला हवा.

## उपहार आग प्रकरण-पुराव्याशी छेडछाड केल्याप्रकरणी अंसल बंधूंना सात वर्षांची शिक्षा

नवी दिल्ली : उपहार थिएटर आग प्रकरणात पुराव्याशी छेडछाड केल्याप्रकरणी दिल्ली न्यायालयाने अंसल बंधू सुशील आणि गोपाळ यांना दोषी ठरवून सात वर्षांची शिक्षा सुनावली आहे. वर्ष 1997 मध्ये दिल्लीतील उपहार थिएटरमध्ये आग लागली होती. या आगीत 59 लोकांचा मृत्यू झाला होता. पटियाला हाऊस कोर्टाने दोघा अंसल बंधूंना प्रत्येकी 2.25 कोटी रुपयांचा दंडही ठोठावला आहे. दोघांनाही एक महिन्यापूर्वी उपहार आग प्रकरणात पुराव्यांशी छेडछाड केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले होते. आज ही शिक्षा जाहीर करण्यात आली.



याआधी अंसल बंधूंना सर्वोच्च न्यायालयाने दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती. नंतर त्यांना 30-30 कोटी रुपयांच्या दंडावर सोडण्यात आले, ज्याचा वापर देशाच्या राजधानीत ट्रॉमा सेंटर बांधण्यासाठी केला जाईल. उपहार आगीच्या घटनेतील अन्य दोन आरोपी हर स्वरूप पनवार आणि धरमवीर मल्होत्रा यांचा खटल्यादरम्यानच मृत्यू झाला. युद्धावर आधारित चित्रपट ‘बॉर्डर’च्या प्रदर्शनादरम्यान उपहार थिएटरमध्ये आग लागली. चित्रपटगृहात अग्निसुरक्षा व्यवस्था नव्हती. त्यामुळे गुदमरून 59 जणांना जीव गमवावा लागला, तर चेंगराचेंगरीमुळे 100 हून अधिक जण जखमी झाले.

अन्य तिघांनाही शिक्षा झाली

न्यायालयाचे माजी कर्मचारी दिनेश चंद शर्मा आणि अन्य दोन आरोपी पीपी बत्रा आणि अनूप सिंग यांनाही सात वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. न्यायालयाने तिघांनाही प्रत्येकी तीन लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.

यांच्यावर झाले आरोप सिद्ध

न्यायालयाने 8 ऑक्टोबर रोजी रिअल इस्टेट व्यावसायिक अन्सल बंधू, न्यायालयाचे माजी कर्मचारी दिनेश चंद शर्मा आणि पीपी बत्रा आणि अनूप सिंग यांना या प्रकरणात दोषी ठरवले होते. अन्य दोन आरोपी हरस्वरूप पनवार आणि धरमवीर मल्होत्रा यांचा खटल्यादरम्यान मृत्यू झाला होता. एव्हीयूटीच्या अध्यक्षा नीलम कृष्णमूर्ती यांच्या याचिकेवर सुनावणी करताना दिल्ली उच्च न्यायालयाने निर्देश दिले होते, ज्याच्या आधारे हा गुन्हा दाखल करण्यात आला. हे प्रकरण आगीच्या घटनेत पुराव्याशी छेडछाड करण्याशी संबंधित आहे ज्यात अंसल बंधूंना दोषी ठरवले गेले आणि सर्वोच्च न्यायालयाने त्यांना दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली.

काय घडले 24 वर्षांपूर्वी

1997 मध्ये बॉर्डर चित्रपटाच्या प्रदर्शनावेळी लागलेल्या भीषण आगीत एकूण 28 कुटुंबानी आपल्या प्रियजनांना गमावले. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन हे प्रकरण सीबीआयकडे सोपविण्यात आले. 15 नोव्हेंबर 1997 रोजी सीबीआयने एकूण 16 जणांवर आरोपपत्र दाखल केले. त्यात उपहारचे मालक गोपाल अन्सल आणि सुशील अन्सल यांचाही समावेश होता.

12 आरोपींना सुनावली शिक्षा

20 नोव्हेंबर 2007 रोजी प्रदीर्घ सुनावणीनंतर पटियाला हाऊस कोर्टाने 12 आरोपींना शिक्षा सुनावली. अंसल बंधूंना निष्काळजीपणा आणि इतर कलमांद्वारे फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. त्यानंतर हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अन्सल बंधूंचा जामीन रद्द करण्यात आला. उच्च न्यायालयाने 6 आरोपींना शिक्षा सुनावली आणि अन्सल बंधूंची शिक्षा 2 वर्षांवरून 1 वर्ष केली. यादरम्यान अन्सल बंधूंना तुरुंगात पाठवण्यात आले.

## व्हिडीओ गेम पार्लरमध्ये पैसे गमावले, युवकाचा विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

वाशिम : आजच्या काळात अनेक जणांना एका रात्रीत मालामाल होऊन धन दांडग्यांच्या पंक्तीत बसण्याची इच्छा असते. यासाठी वाशिमच्या कारंजा तालुका स्तरावर काही जणांनी व्हिडिओ गेम पार्लरच्या नावाखाली आपली दुकानदारी थाटली आहे. नागरिकांच्या खिशाला कात्री लावण्याचा प्रकार पाहायला मिळत आहे. तर काही नागरिक सुद्धा रुपयाला दहा रुपये या प्रमाणे आपण सुद्धा पैशाच्या या डावात मालामाल कसे होऊ, या हव्यासातून स्थानिक व्हिडीओ गेम पार्लरच्या प्रलोभनाला बळी पडत आहेत.

इलेक्ट्रॉनिक्स मशीनवर कॉईन्सच्या माध्यमातून वरली-मटकाप्रमाणे आकडेमोड करत दामदुप्पट पैसे कमवण्याच्या नादात आपली रोजची मिळकत डावावर लावून कंगाल होताना दिसत आहे.

5 नोव्हेंबर रोजी स्थानिक गवळीपुरा येथील रहिवाशी युवकाने आपली रोजची मिळकत या व्हिडीओ गेम पार्लरमध्ये हरल्याने नैराश्यातून आपले आयुष्यच या व्हिडीओ गेम पार्लरच्या डावावर लावल्याची घटना उघडकीस आली आहे.




काय आहे प्रकरण?

कारंजा शहरातील स्थानिक शिवाजी नगर परिसरातील हनुमान मंदिराच्या समोरील संकुलामध्ये राधाकृष्ण व्हिडिओ गेम पार्लर आहे. इथे लावण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक्स मशीनवर आपले नशीब आजमवण्यासाठी गवळीपुरा येथील युवक येऊन कॉईन्सच्या माध्यमातून आकडेमोड करत डावावर खेळत होता. आपली रोजची मिळकत सुद्धा हातची गेल्याने त्याने या नैराश्यातून तिथेच विषारी औषध पिऊन आपली जीवन यात्रा संपवण्याचा प्रयत्न केला. दुकान मालक कृष्णा देशमुख यांनी हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. महसूल विभागाच्या अखत्यारीत येत असलेल्या मनोरंजन विभागा शिवाय पोलीस विभागाच्या दालनात जाऊ नये यासाठी युवकाला दवाखान्यात नेल्याची माहिती आहे. या व्हिडिओ गेम पार्लरमध्ये चौधरी नावाचा सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी यांची सुद्धा भागीदारी असल्याची चर्चा आहे. कारंजा शहरात मनोरंजनाच्या नावाखाली शासन मान्यता प्राप्त अनेक व्हिडिओ गेम पार्लर अनुज्ञप्ती उदयास आल्या आहेत. यामध्ये, शासनाने या अनुज्ञप्तीला परवाने बहाल करताना अनेक निकषांचे जाळे विणले आहे.

# पत्नीसमोरच पतीने घेतला गळफास

नागपूर, कौटुंबिक कलहातून पतीने पत्नीसमोरच गळफास घेऊन आत्महत्या केली. ही खळबळजनक घटना वर्धा मार्गावरील सीआयसीआर क्वॉर्टर येथे रविवारी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास घडली. टिकाराम गोकुल अरखेल (वय ५४) असे मृतकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार टिकाराम हे केंद्रीय कापूस अनुसंधान केंद्रात चतुर्थश्रेणी कर्मचारी होते. त्यांचा पत्नीसोबत वाद व्हायचा. काही दिवसांपूर्वी एका नातेवाईक महिलेसोबतही त्यांचा वाद झाला. तिने बेलतरोडी पोलिसांत तक्रार दिली. याप्रकरणी पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली. पोलिसांत तक्रार दिल्याने टिकाराम तणावात राहायला लागले. रविवारी सकाळी पत्नीसमोरच त्यांनी पंख्याला दोरी बांधून गळफास घेतला. त्यांच्या पत्नीने आरडाओरड केली. शेजाऱ्यांच्या मदतीने



पत्नीने टिकाराम यांच्या गळ्याभोवतीचा फास काढला. टिकाराम यांना मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी बेलतरोडी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. युवकाने केले विष प्राशन तहसील पोलिस स्टेशनअंतर्गत येणाऱ्या नालसाहब चौक परिसरात राहणाऱ्या ३४वर्षीय युवकाने विष प्राशन करून आत्महत्या केली. नीरज रामजी शेंडे असे मृतकाचे नाव आहे. तो बीअरबारमध्ये काम करायचा. २५ ऑक्टोबरला नीजरने विष घेतले. त्याची प्रकृती खालावली. नातेवाइकांनी त्याला मेयो हॉस्पिटलमध्ये दाखल केले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. अन्य एका घटनेत वाठोड्यातील आदित्यनगर येथे २८वर्षीय आशिष राजेंद्र जाधव याने पंख्याला दोरी बांधून गळफास घेतला. रविवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास ही घटना उघउकीस आली. दोघांच्याही आत्महत्येचे कारण कळू शकले नाही.

# नेपाळी वॉचमनने वृद्धेला बांधत घर लुटलं! साडेसात लाखांचा मुद्देमाल घेऊन पसार



ठाणे : इमारतीच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या नेपाळी वॉचमननेच एक घर लुटून पोबारा केल्याची धक्कादायक घटना उल्हासनगरात घडली आहे. या वॉचमनने त्याच्या तीन साथीदारांसह एका 76 वर्षाच्या वृद्ध महिलेला बांधून ठेवलं आणि सातेसात लाखांचा मुद्देमाल घेऊन पसार तो झाला. उल्हासनगरच्या कॅम्प 3 मधील सेक्शन 20 मध्ये शुक्रवारी ही घटना घडली. या घटनेनं उल्हासनगर शहरात खळबळ उडाली आहे.
उल्हासनगरच्या कॅम्प 3 मधील सेक्शन 20 या भागात असलेल्या लिला व्हिला इमारतीत व्यावसायिक मनोजकुमार बजाज हे त्यांच्या आई, पत्नी आणि मुलासह वास्तव्याला आहेत. शुक्रवारी मनोज हे नेहमीप्रमाणे त्यांच्या व्यवसायासाठी निघून गेले, तर मनोज यांची पत्नी आणि मुलगा दुपारी एका नातेवाईकांकडे गेले. यावेळी मनोज यांची 76 वर्षीय आई लाजवंती बजाज या घरात एकट्याच होत्या. हीच संधी साधत त्यांच्या इमारतीचा नेपाळी वॉचमन दीपक हा पार्सल देण्याच्या बहाण्याने त्यांच्या घरात आला. यानंतर त्याने लाजवंती यांना पाणी मागितलं. पाणी देण्यासाठी लाजवंती मागे वळताच त्याचे आणखी दोन साथीदार हे कटावणी, मोठे स्क्रू ड्रायव्हर घेऊन घरात घुसले. त्यांनी आधी लाजवंती यांचे हातपाय सेलो टेपने बांधून ठेवले. मात्र त्यांनी प्रतिकार केल्यानं या तिघांनी त्यांच्या तोंडात बोळा कोंबत त्यांचा आवाज दाबला. त्यानंतर घरातली दोन कपाटं फोडून त्यातून 4 लाख 70 हजार रुपयांची रोख रक्कम, दागिने असा सरकारी मूल्यानुसार सुमारे साडेसात लाख रुपयांचा ऐवज घेऊन पोबारा केला.
ही जबरी चोरी करून इमारतीतून पळून जाताना चार जण सीसीटीव्हीत कैद झाले. त्यामुळं एक जण खाली रखवालीसाठी उभा केल्याचा संशय व्यक्त होतोय. या घटनेनंतर काही वेळाने लाजवंती यांची सून आणि नातू हे घरी आले असता त्यांना लाजवंती या सेलोटेपने गुंडाळलेल्या अवस्थेत दिसल्या. त्यामुळं त्यांनी त्यांची सुटका केली असता, इमारतीचा वॉचमन दीपक यानेच त्याच्या साथीदारांच्या मदतीने ही चोरी केल्याची धक्कादायक बाब समोर आली. याप्रकरणी मनोज बजाज यांच्या तक्रारीनुसार मध्यवर्ती पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला असून दीपकच्या शोधासाठी 8 टीम रवाना करण्यात आल्या आहेत. तर क्राईम ब्रँचकडूनही या प्रकरणाचा स्वतंत्र तपास सुरू करण्यात आलाय.

# वृद्धाच्या डोक्यात बाटली फोडणारे अटकेत

नवी मुंबई, नेरूळ येथील गावदेवी मंदिराच्या आवारात दारू पिण्यासाठी बसलेल्या तरुणांना हटकणाऱ्या ७२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाच्या डोक्यावर दोघा तरुणांनी दारूची बाटली फोडून पलायन केल्याची घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात हा ज्येष्ठ नागरिक जबर जखमी झाला असून त्यांना महापालिकेच्या वाशी येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर नेरूळ पोलिसांनी दोघा हल्लेखोर तरुणांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.
या घटनेत जखमी झालेले नारायण गणु पाटील (७२) हे ज्येष्ठ नागरिक नेरूळ गावात कुटुंबासह राहण्यास असून ते नेरूळमधील गावदेवी मंदिराचे विश्वस्त आहेत. पाटील हे दररोज सायंकाळी देवीची आरती करण्यासाठी जात असतात. लक्ष्मीपूजनाच्या दिवशीही रात्री आठ वाजण्याच्या सुमारास ते गावदेवी मंदिरात आरतीसाठी गेले होते. मात्र ते जाण्यापूर्वीच आरती झाल्याने काहीकाळ मंदिरात थांबून ते रात्री साडेआठच्या सुमारास घरी जाण्यासाठी निघाले. यावेळी मंदिराच्या आवारात बाथरूमजवळ नारायण पाटील यांच्या ओळखीतील तरुण रतिन मदन आचार्य (२३) व त्याचा साथीदार पियुष पाटील (२१) हे दोघे तरुण दारू पित बसल्याचे नारायण पाटील यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे पाटील यांनी दोघांना हटकून त्यांना मंदिर आवारात दारू न पिण्याबाबत समज दिली.
या गोष्टीचा त्यांना राग आल्याने पियुष पाटील याने त्यांना शिवीगाळ केली, तर रतिन आचार्य याने नारायण पाटील यांचे दोन्ही हात पकडून ठेवले. त्यानंतर पियुष पाटील याने नारायण पाटील यांच्या डोक्यात दारूची काचेची बाटली फोडली. त्यामुळे नारायण पाटील यांच्या डोक्याला जबर दुखापत होऊन ते खाली पडले. त्यानंतर दोघा हल्लेखोर तरुणांनी त्या ठिकाणावरून पलायन केले. यावेळी त्या भागात असलेल्या नागरिकांनी जखमी नारायण पाटील यांना तत्काळ मीनाताई



ठाकरे रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना वाशीतील महापालिकेच्या रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी नारायण पाटील यांनी नेरूळ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी रतिन आचार्य व पियुष पाटील या दोघांवर कलम ३२४ प्रमाणे गुन्हा दाखल करून शनिवारी दोघांना अटक केली.

# पुण्यात 29 वर्षीय महिलेवर सामूहिक बलात्कार, गोठ्यात डांबून दोघांकडून अत्याचार



पुणे : गुरं बांधायला गोठ्यात गेलेल्या महिलेवर सामूहिक बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना पुणे जिल्ह्यात उघडकीस आली आहे. 29 वर्षीय शेतकरी महिलेने या प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल केली आहे. दोघा जणांनी आपल्यावर सामूहिक बलात्कार केल्याचा आरोप महिलेने केला आहे. गेल्या काही महिन्यात पुणे परिसरात महिला अत्याचाराच्या अनेक घटना ऐकायला मिळत आहेत.

### काय आहे प्रकरण?

पुणे जिल्ह्यात भोर तालुक्यातील भांबवडे गावात ही घटना घडल्याची माहिती आहे. 29 वर्षीय पीडित शेतकरी महिलेने राजगड पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. पीडितेच्या तक्रारीवरून राजगड पोलिसांनी तिघा आरोपींच्या विरोधात बलात्कार आणि विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

### नेमकं काय घडलं?

शेतकरी महिला आपल्या गोठ्यात गुरं- ढोरं बांधत होती. त्यावेळी आरोपी अनिल आणि महेश तिथे अचानक गेले. त्या नंतर गोठ्याच्या दाराची कडी त्यांनी लावून घेतली. महिला एकटी असल्याची संधी साधत आरोपी अनिल आणि महेश यांनी पीडित शेतकरी महिलेवर सामूहिक बलात्कार केल्याचा आरोप आहे. 10 ऑक्टोबर 2021 ते 5 नोव्हेंबर 2021 या काळात ही घटना घडल्याचा दावा केला जात आहे. गुन्ह्याचे गांभीर्य पाहून राजगड पोलिसांनी बलात्कार आणि विनयभंग प्रकरणी तिघा आरोपींना तातडीने अटक केली आहे.

# अनधिकृत लिंकवर केवायसी अपडेट, दीड लाखांची फसवणूक, औरंगाबाद पोलिसांच्या तत्परतेने अर्ध्या तासात रक्कम परत

औरंगाबादः होम लोनवर टॉप अप लोन घेताच केवायसी अपडेट करण्याचे आमिष दाखवून मुख्याध्यापकाच्या खात्यातील जवळपास दीड लाख रुपयांवर डल्ला मारल्याचा प्रकार औरंगाबादेत घडला. मात्र सदर मुख्याध्यापकाने तत्काळ शहरातील सायबर पोलिसात (Cyber police) धाव घेतल्याने काही तासातच हे पैसे परत मिळाले. त्यामुळे मुख्याध्यापकांना मोठा दिलासा मिळाला. या घटनेनंतर सायबर पोलिसात (Aurangabad police ) तत्काळ तक्रार दाखल करणे किती उपयुक्त ठरू शकते, हे लक्षात येते.

### बँक खात्यातील रकमेवर सायबर गुन्हेगारांचे लक्ष

सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्याध्यापक राजेंद्र कहाटे यांनी होम लोन घेतले होते. काही दिवसांपूर्वी त्यांनी होम लोनवर टॉपअप लोन घेतले होते. टॉप अप लोनची मोठी रक्कम त्यांच्या बँक खात्यात येताच त्यांना केवायसी अपडेट करण्याबाबत मेसेज आला. कर्जाची रक्कम इतरत्र पाठवायची असल्याने त्यांना खात्याची क्रेडिट लिमिट वाढवणे गरजेचे वाटले. मेसेजमधील लिंकवर क्लिक करून त्यांनी पुढील माहिती भरली. त्यानंतर काही वेळातच त्यांना त्यांच्या खात्यातून एक




लाख 54 हजार 555 रुपये काढून घेतल्याचे लक्षात आले. लिंकवर जाऊन माहिती भरल्याने आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. मात्र त्या दिवशी रविवार असल्याने बँक बंद होती. अशा वेळी कहाटे यांनी तत्काळ पोलीस आयुक्तालयातील सायबर पोलीस ठाण्याशी संपर्क साधला.

### सायबर पोलिसांची कारवाई, अर्ध्या तासात रक्कम परत

औरंगाबाद पोलीस आयुक्तालयातील सायबर पोलीसांनी हे प्रकरण मोठ्या तत्परतेने हाताळले. तेथील अंमलदार सुशांत शेळके व वैभव वाघचौरे यांनी ही रक्कम ज्या वॉलेटला गेली, त्या वॉलेटच्या नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून अर्ध्या तासात एक लाख 45 हजार 662 रुपये रोखले. काही वेळाने ही रक्कम कहाटे यांना परत मिळाली. ही कामगिरी पोलीस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता, उपायुक्त अपर्णा गिते, सहाय्यक आयुक्त विशाल ढुमे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल सातोदकर, उपनिरीक्षक राहुल चव्हाण, वारे, सविता तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### लिंकची खात्री केल्याशिवाय माहिती भरू नका

दिवसेंदिवस सायबर गुन्हेगारीचे प्रकार वाढत असून नागरिकांनी आर्थिक व्यवहार करताना सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. अनोळखी फोन कॉल्स, मेसेज अथवा लिंकवर विश्वास ठेवून आपल्या बँक खात्याची कोणतीही वैयक्तिक माहिती देऊ नका, कोणतीही बँक अशा प्रकारची माहिती फोनद्वारे विचारत नाही. बँक खात्याविषयी माहिती करिता संबंधित बँकेच्या शाखेत जाऊनच खात्री करावी. नागरिकांसोबत अशी कोणत्याही प्रकारची फसवणूक झाल्यास लगेच जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा सायबर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन शहर पोलीस दलाच्या वतीने सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल ढुमे यांनी केले.

# कोकण, गोव्यात पावसाच्या हलक्या सरींचा अंदाज, कुठे कसं तापमान?

मुंबई : अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर आज आणि उद्या (8 आणि 9 नोव्हेंबर) कोकण आणि गोव्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. हवामान विभागाच्या मते, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडे राहील. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा जोर आणखी वाढला असला तरी ते किनारपट्टीपासून दूर आहे. मात्र तरीही त्याचा परिणाम अद्याप कोकण



किनाऱ्यावर होत असून, रविवारी संपूर्ण मुंबईत ढगाळ वातावरण होते. याचा प्रभाव पुढील दोन दिवस कायम राहणार असून 8 आणि 9 नोव्हेंबर रोजी कोकण, गोव्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. सध्या कुठे कसं तापमान? काल (रविवारी) कोकण, गोव्यात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची नोंद झाली. मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं होतं. मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी तापमान सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली होती. विदर्भाच्या बऱ्याच भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे. उर्वरित राज्यात किमान तापमान सरासरीच्या जवळपास नोंदविण्यात आले आहे. तर तर कोकण, गोव्यात काही ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली.

# कुटुंब बाहेरगावी गेलं होतं, बंगल्यावर पोहोचल्यानंतर 'ते' दृश्य बघून हादरलेच!



नाशिक: नाशिक आणि औरंगाबादमध्ये अनेक चोरीच्या घटना घडल्याचे उघडकीस आले आहे. नाशिकमधील गंगापूर आणि सरकारवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन घरे फोडण्यात आली. यात १ लाख १९ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला. दोन्ही कुटुंब बाहेरगावी गेले असताना, हा प्रकार घडला. गंगापूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका बंद घरातून सुमारे ५९ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. तक्रारीनुसार, कुटुंब बाहेरगावी गेले होते. या काळात काही अज्ञात चोरटे बंगल्याच्या खिडकीच्या काचा फोडून आत शिरले. त्यांनी घरातील कपाट फोडले आणि लॉकरमधून सोन्याचे आणि चांदीचे दागिने असा ५९ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. सरकारवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतही एक चोरीची घटना घडली आहे. बंद घरातून साठ हजार रुपयांची सोन्याची चेन चोरीला गेली. पोलिसांच्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी साडेसातच्या सुमारास घरातील सर्व मंडळी दैनंदिन कामात व्यग्र होते. त्याचवेळी कुणीतरी त्यांच्या फ्लॅटमध्ये प्रवेश केला आणि सोन्याची चेन पळवली.
औरंगाबादमध्येही २४ तासांत दोन घरफोड्या
दिवाळीच्या सणात औरंगाबादमध्ये चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. गेल्या २४ तासांत चोरीच्या दोन घटना घडल्या आहेत. ६ नोव्हेंबर रोजी रात्री बेगमपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरट्यांनी घरे फोडली. ३५ वर्षीय तक्रारदाराने घर फोडून ४४ हजार ९०० रुपये किंमतीचा ऐवज चोरून पोबारा केला. दिवाळीच्या सुट्टीसाठी बाहेरगावी गेल्याचे तक्रारदाराने सांगितले. चोरट्यांनी घराचा दरवाजा तोडून आतमध्ये प्रवेश केला आणि घरातील सोन्याचे दागिने आणि रोकड लंपास केली. सिडको पोलीस ठाण्यातही अशीच एक चोरीची घटना घडली आहे. चोरट्यांनी ३५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. या प्रकरणी पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बाहेरगावी गेल्यानंतर नागरिकांनी जवळच्या पोलीस ठाण्यांत माहिती द्यावी, जेणेकरून त्या-त्या परिसरात गस्त वाढवता येईल,

# नोटाबंदीच्या घिसडघाईबद्दल केंद्राने देशाची माफी मागावी; संजय राऊत यांची मागणी

मुंबई: नोटाबंदीला पाच वर्षपूर्ण झाली आहेत. त्यावरून शिवसेना नेते संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. नोटाबंदीच्या घिसाडघाईबद्दल केंद्र सरकारने देशाची माफी मागायला हवी, अशी मागणी संजय राऊत यांनी केली आहे. शिवसेना नेते संजय राऊत यांनी मीडियाशी बोलताना ही मागणी केली आहे. नोटाबंदीच्या निर्णयानंतर आज पाच वर्षात काश्मीरमध्ये सर्वाधिक दहशतवाद वाढला आहे. याच पाच वर्षात देशात सर्वात जास्त काळापैसा वाढला आहे. त्यामुळे नोटाबंदी पूर्ण अपयशी ठरली आहे. नोटाबंदीचा निर्णय हा आर्थिक डिजास्टर होता. नोटाबंदी झाल्यावर शेकडो लोकांना नोकरी आणि प्राण गमवावा लागला होता. त्यामुळे नोटाबंदीच्या घिसडघाईबद्दल केंद्र सरकारने देशाची माफी मगायला हवी, असं राऊत म्हणाले.
आधी अतिरेक्यांचे अड्डे उखडून फेका भाजपच्या कार्यकारिणीच्या बैठकीत भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी महाराष्ट्रातून केंद्र सरकार उखडून फेका असं आवाहन केलं आहे. नड्डा यांच्या आवाहनाची राऊत यांनी खिल्ली उडवली आहे. जेपी नड्डा सदगृहस्थ आहेत. चांगले नेते आहेत. त्यांनी सांगितलं की महाराष्ट्रातून महाविकास आघाडीचं सरकार उखडून फेका. त्याच्याआधी त्यांनी अरुणाचल प्रदेशमध्ये चीन जे घुसलं आहे आणि चीनने आपल्या हद्दीत गावं बसवली आहेत. त्यांनी सर्वात आधी अरुणाचलप्रदेशातून चीनला उखडून फेकलं पाहिजे. जम्मू काश्मीरमध्ये अतिरेकी हल्ले वाढले आहेत. अतिरेक्यांचे अड्डे वाढले आहेत. त्यांना ताबडतोब उखडून फेकलं पाहिजे, असं आव्हानच त्यांनी केलं. भाजपला वैफल्य येणं स्वाभाविक भाजपची भूमिका समजू शकतो. महाराष्ट्रात प्रयत्न करूनही भाजपला आघाडीचा बालही बाका करता आला नाही. इतकं मोठं राज्य, केंद्रीय सत्ता, संपूर्ण केंद्रीय यंत्रणा हाताशी धरून दहशत, दबाव आणि



पैसा याचा वापर करूनही सरकार पडत नसेल तर वैफल्य येणं हे स्वाभाविक आहे, असा चिमटाही त्यांनी काढला. नंतर महाराष्ट्राकडे वळा राष्ट्रीय सुरक्षेसाठी अरुणाचलमधून चीनला आणि काश्मीरमधून अतिरेक्यांना उखडून झालं की मग भाजपने पूर्णपणे महाराष्ट्राकडे वळावं आणि राजकीय उखडबाजी जी काही आहे जरूर करावी. राजकारणात लोकशाहीत एखादं सरकार लोकशाही मार्गाने हटविण्याचा अधिकार दुसऱ्या पक्षाला आहे. पण उखडण्याची भाषा करत असाल तर सीमेवर जी लोकं घुसली आहेत आणि गावंच्या गावं बसवली आहेत,

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898